# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २९/०३/२०२५ ( शनिवार ) सकाळ**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक २९/०३/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जाणार आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन कुही हद्दीत मौजा पाचगाव ते कुही फाटा येथे पेट्रोलींग केली असता संशयीत वाहन अशोक लेलॅन्ड कंपनीचा दहा चाकी टिप्पर क्र एम.एच ४९ बी.झेड.५६०२ मिळुन आले. वाहन थांबवुन वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **सुनिल बरसु उरकुडे, वय ४९ वर्ष, रा. परसोडी, जवाहरनगर, भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन मालकाबाबत विचारपुस केली असता सदर **वाहन दिपक मानापुरे, रा. नागपुर** यांच्या मालकीचे असल्याची माहीती प्राप्त झाली. नमुद वाहन चालकाला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नसल्याचे सांगितले.

पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) १० ब्रास रेती किंमती ५०,०००/—रूपये आणि २) टिप्पर क्र एम.एच ४९ बी.झेड .५६०२ किंमती ४५,००,०००/— रूपये असा एकुण **४५,५०,०००/—रूपया**चा मुददेमाल जप्त केला आहे.

**सदर प्रकरणी वाहन चालक आणि मालक याच्या विरूध्द पोस्टे कुही येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंध अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर